**<u>विशेष दिवाणी क्रमांक ४४/२०२२.</u>**
**<u>नि.क्र. ६३.</u>**

**<u>वादीतर्फे साक्षीदार क्र. ०२ लता विलास शेळके यांचा पुढील सरतपास विधीज्ञ श्री. बी. एस. शिंदे यांचेमार्फत शपथेवर सुरु :—</u>**

**०१.** सदरच्या प्रकरणांत मी पुरावाकामी प्रतिज्ञालेख दाखल केला असुन त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. तो. **<u>नि.क्र. ६३</u>** वर आहे.

**<u>सरतपास पुर्ण.</u>**

**<u>उलटतपास प्रतिवादी क्र. १ ते ७ चे विधीज्ञ श्री. ए. टी. हजारे यांचेमार्फत शपथेवर सुरु :—</u>**

**०२.** माझे शिक्षण इयत्ता दहावी पर्यंत झाले आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादी विलास माझे पती आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी नं.१ व ३ ते ५ हे माझे पती विलास यांचे सख्खे भाउ आहेत. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी नं.६ ते ८ या माझ्या पतीच्या सख्ख्या बहिणी आहेत. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी नं.२ रत्नमाला माझी सासु आहे. हे म्हणणे खरे आहे की, लग्न झाल्यापासुन मी व माझे पती एका विचाराणे घरातील सर्व कामे करतो व त्यामुळे मला घरातील सर्व व्यवहारांची माहिती आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतींबाबत मला पुर्ण माहिती आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पुराव्याकामी प्रतिज्ञालेखातील सर्व माहिती माझ्या पतीने वकिलांना सांगितली. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या पतीच्या सांगण्यावरून साक्ष देत आहे. मी सदर दावा अनेकवेळा वाचला आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर दाव्यात केलेल्या मागणी व्यतिरीक्त आमची प्रतिवादी नं.१ कडे दुसरी कोणतीही मागणी नाही. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकती ह्या माझ्या पतीच्या बहिणींचे लग्न झाल्यानंतर माझे पती व त्यांच्या भावांच्या ताब्यात होती व ते सर्व भाउ आनंदाने दावा मिळकत वहिती करीत होते. माझे लग्न वादीसोब सन १९९२ मध्ये झाले. मला एक मुलगा व एक मुलगी आहे. माझा मुलगा प्रमोद हा फायनान्स कंपनीत काम करतो.

**०३.** माझे पती संतलोक हॉस्पीटल, श्रीरामपुर येथे सन १९९३ ते सन २०१४ पर्यंत रूग्णवाहिका चालक म्हणुन काम करीत होते. त्या दरम्यान मी गृहिनी म्हणुन काम करत होते. माझ्या पतीला दरमहा १९,०००/— रूपये वेतन होते व ते त्या वेतनानुसार घर खर्च करत होते. हे म्हणणे खरे आहे की, आम्हाला पैशांची अडचण कधीही भासली नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पतीला दारूचे व्यसन होते. हे म्हणणे खरे आहे की, माझे पती नोकरी करीत असतांना त्यांनी शिरसगांव, ता. श्रीरामपुर येथे राहण्याकरीता घर विकत घेतले होते. हे म्हणणे खरे नाही की, घर घेण्याकरीता आम्ही कर्ज काढले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पतीने नोकरी सोडल्यानंतर व्यवसाय करण्याकरीता प्रतिवादी नं.१ ने माझ्या पतीला चारचाकी वाहन विकत घेवून दिले. हे म्हणणे खरे नाही की, त्या वाहनातुन आमच्या घरातील कुटूंबाचा उदरनिर्वाह चालत असे.

**<u>प्रश्न</u>:—** तुमचे पती नोकरी करीत असल्यामुळे गावी दावा मिळकत ही त्यांचे भाउ राजेंद्र, बापु व संदिप हे वहिती करीत होते ?

**<u>उत्तर</u>:—** आम्ही देखील जावुन येवून दावा मिळकत वहिती करीत होतो. गावी केवळ प्रतिवादी नं.५ संदिप होता.

**०४.** हे म्हणणे खरे आहे की, गट नं.२२ मध्ये एकुण २४ गुंठे जमिन आहे. हे म्हणणे खरे आहे की, तुकडे बंदी कायद्यामुळे आजपर्यंत माझे पती व त्यांच्या भावांमध्ये वाटप होवू शकलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, वाटप झाले नसले तरीही मी व माझे पती हे आमचा हिस्सा वहिती करीत होतो. हे म्हणणे खरे आहे की, २१ गुंठे क्षेत्राच्या जमिनीतुन जास्तीत जास्त वार्षिक उत्पन्न ५० ते ६० हजार रूपये मिळु शकते.

**०५.** हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी नं.१ हा उच्च पदावर नोकरीवर होता व त्याची पत्नी देखील नोकरीवर होती. हे मला माहित नाही की, त्यामुळे प्रतिवादी नं.१ कडे भरपुर पैसा होता. प्रतिवादी नं.१ यास अनिरूध्द नावाचा एक मुलगा आहे व त्यास अद्याप नोकरी लागलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, अनिरूध्द हा गावी उंबरीबाळापुर येथे राहतो.

**०६.** हे म्हणणे खरे आहे की, गावात पोल्ट्री व्यवसाय सुरू करण्यासाठी सर्वप्रथम ग्रामपंचायतीची परवानगी घ्यावी लागते. हे म्हणणे खरे आहे की, अनिरूध्दसाठी प्रतिवादी नं.१ ने ग्रामपंचायतीकडे पोल्ट्री व्यवसाय सुरू करण्याकरीता परवानगी अर्ज केला होता. हे म्हणणे खरे नाही की, वादी व प्रतिवादी यांनी ग्रामपंचायत कार्यालयात जावुन अनिरूध्दच्या पोल्ट्रीकरीता संमती दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, ग्रामपंचायतीने परवानगी दिल्यानंतर प्रतिवादी नं.१ ने दावा मिळकतीवर पोल्ट्रीचे बांधकाम केले. हे म्हणणे खरे आहे की, बांधकाम झाल्यानंतर ग्रामपंचायतीचे अधिकारी स्वत: जागेवर आले होते व त्यांनी बांधकामाची नोंद घ ेतली होती.

**<u>प्रश्न</u>:—** ग्रामपंचायात अधिका—यांनी जागेवर येवुन बांधकाम कोणी केले याची चौकशी करून प्रतिवादी नं.१ च्या नावाची नोंद केली ?

**<u>उत्तर</u>:—** घरातील कर्ता पुरूष म्हणुन प्रतिवादी नं.१ च्या नावाची नोंद घेण्यात आली आहे.

**०७.** हे म्हणणे खरे आहे की, पोल्ट्रीची नोंद ही अनिरूध्द विनायक शेळके याच्या नावाने ग्रामपंचायत अभिलेखात घेण्यात आली आहे. हे मला माहित नाही की, त्यास ग्रामपंचयात मिळकत क्रमांक ११६६ असा क्रमांक पडला आहे.

**<u>प्रश्न</u>:—** पोल्टी व्यवसाय हा तुम्हाला फसवुन करण्यात आला याबाबत तुम्ही आज पर्यंत कुठेही तक्रार दिलेली नाही ?

**<u>उत्तर</u>:—** त्यांनी आम्हाला रक्कम देण्याचे कबुल केले होते म्हणुन आम्ही आजपर्यंत कुठेही तक्रार केलेली नाही.

**०८.** आमच्यात रक्कम ठरली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीवर टाकण्यात आलेली पोल्ट्री हा वातानुकूलीत आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर पोल्ट्री ४६ बाय ३७० फुट आहे. हे म्हणणे खरे नाही की, पोल्टी टाकण्याकरीता प्रतिवादी नं.१ ला क्षेत्र कमी पडत होते म्हणुन त्याने माझ्या पतीकडे क्षेत्राची मागणी केली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी माझ्या पतीने आमच्या हिस्याचे क्षेत्र देण्यास नकार दिला. हे म्हणणे खरे नाही की, नाईलाजास्तव

प्रतिवादी नं.१ ने प्रतिवादी नं.२ ते ७ यांच्याकडे क्षेत्राची मागणी केली. हे मला माहित नाही की, तुकडेबंदी कायद्याची बाधा असल्यामुळे प्रतिवादी नं.२ ते ७ यांनी त्यांच्या अविभक्त हिश्याचे क्षेत्र प्रतिवादी नं.१ यास देण्याचे मान्य केले. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी नं.२ ते ७ यांनी माझ्या पतीच्या हिश्यात कोणताही धक्का न लावता त्यांच्या हिश्याचे क्षेत्र नोंदणीकृत हक्कसोड दस्त क्रमांक ५९६/२०२२ अन्वये प्रतिवादी नं.१ च्या लाभात करून दिला. तो हक्कसोड दस्त मी पाहिलेला नाही. पोल्ट्रीचे बांधकाम आम्ही कोणत्या ठेकेदाराला दिले होते हे मला आज आठवत नाही. पोल्ट्री बांधकामाचे मटेरीअल कुठून आणले हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीवरील पोल्ट्रीकरीता ५० ते ६० लाख रूपये खर्च आला आहे. हे म्हणणे खरे नाही की, घर खर्चासाठी कोणीही साधारणत: पाच हजार रूपये घरी ठेवते. हे म्हणणे खरे आहे की, बाकी सर्व रक्कम आम्ही बॅकेत ठेवतो. माझे पती रिटायर्ड झाल्यानंतर त्यांना नोकरीच्या ठिकाणाहुन पाच लाख रूपये मिळाली व ती त्यांच्या एस बी आय बॅक खात्यावर जमा झाली. सदर पाच लाख रूपये रक्कम आम्ही प्रतिवादी नं.१ ला रोख स्वरूपात सन २०१८ साली दिली. सदर खात्याचा खाते उतारा मी अभिलेखावर दाखल करू शकते. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी नं.१ व त्याच्या पत्नीने अनिरूध्द करीता दावा मिळकतीवर पोल्ट्रीचे बांधकाम करून दिले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी व माझे पतीने पोल्ट्री करीता एकही रूपया दिलेला नाही.

**०९.** हे म्हणणे खरे आहे की, सदर दाव्यात माझ्या पतीने शासनास पक्षकार म्हणुन सामिल केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी नं.१ ने त्याच्या मुलाकरीता पोल्ट्री व्यवसाय सुरू केला ही बाब आम्हाला न पटल्यामुळे आम्ही सदरचा खोटा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी नं.१ ने त्याच्या सर्व भावांचे शिक्षण व लग्न केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पुराव्याकामी प्रतिज्ञालेखातील सर्व मजकुर खोटा आहे व मी आजरोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

<u>उलटतपास प्रतिवादी क्र. ८ तर्फे विधीज्ञ श्री. के. डी. दारोळे यांनी वरील उलटतपास स्वीकारला.</u>

सा.वा.दा.ब.अ.क.के. श्रवणोत्तर स्विकृती

JOSHI PRASAD BALKRISHNA

Digitally signed by JOSHI PRASAD BALKRISHNA
Date: 2025.11.20 17:38:33 +0530

दिवाणी न्यायाधीश व.स्तर, संगमनेर. ( प्रसाद बा. जोशी )
दि. २०/११/२०२५. ५ वे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, संगमनेर.